MHRG040007062026

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | - | १०/०२/२०२६ |
| नोंदणी तारीख | - | १७/०२/२०२६ |
| निकाल तारीख | - | ०८/०५/२०२६ |
| कालावधी | - | ०० वर्षे ०२ म. २८ दि. |

**पाचवे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

**हिंदु विवाह अर्ज नं. १५३/२०२६ नि.क्र. १८**

**अर्जदार क्र.०१**

**अर्जदार क्र.०२**

हिंदु विवाह कायदा कलम १३ ब प्रमाणे अर्ज

---

अर्जदार क्र.०१ व ०२ तर्फे वकील श्रीमती. सविता शुक्ला

---

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०८/०५/२०२६)

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हिंदु विवाह कायदा कलम १३ ब मधील तरतुदीनुसार संमतीने घटस्फोट घेऊन मिळण्याकरिता सादर केला आहे.

**०२. अर्जातील हकिकत थोडक्यात अशी आहे की,**

अर्जदारांचे कथन की, अर्जदार क्र. ०१ व ०२ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे दि. ०६/१२/२०१९ रोजी अलिबाग येथे झालेला आहे. विवाह संबंध अद्याप कायम असून सदर विवाह संबंधांपासून अर्जदारांना कोणतेही अपत्य नाही.

**०३.** लग्नानंतर सुरूवातीचा काही काळ अर्जदार एकत्र राहिले. परंतु त्यानंतर त्यांच्यामध्ये वारंवार वैचारिक तसेच कौटुंबिक मतभेद होऊ लागल्याने वादविवाद सुरू झाले. त्यामुळे उभयपक्षी अर्जदारामध्ये सतत भांडण तंटे वाढल्यामुळे उभयपक्षी अर्जदार यांना एकत्र संसार करणे अशक्यप्राय झाले. त्यामुळे दि.१०/०९/२०२२ पासून दोघेही एकमेकांपासून वेगळे राहात आहेत. अर्जदार क्र.०१ व ०२ यांनी आपसातील लग्न संबंधीचे वाद संमतीने घटस्फोट घेऊन कायम स्वरूपी संपुष्टात आणण्याचे ठरविले आहे. अर्जदारांनी त्यांचे पती पत्नीचे नाते टिकून राहणे अशक्य असल्याने दोघांनीही एक विचाराने, संमतीने व स्वेच्छेने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे व त्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** अर्जातील कथने व वकीलांच्या युक्तीवादावरून खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेनुसार नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र.०१ व ०२ हे संमतीने घटस्फोट मिळण्यास पात्र आहेत काय? | ..होय |
| २) | काय आदेश? | ..अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ साठी** :–

**०५.** अर्जदारांचे कथन की, अर्जदार क्र.०१ व ०२ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे दि. ०६/१२/२०१९ रोजी अलिबाग येथे झालेला आहे. विवाह संबंध अद्याप कायम असून सदर विवाह संबंधांपासून अर्जदारांना कोणतेही अपत्य नाही. दोघांना स्वखुशीने घटस्फोट घेण्याची इच्छा आहे. वरील कथनास दुजोरा देण्याकरीता दोन्ही अर्जदारांनी **नि.१२** व **नि.१५** प्रमाणे शपथेवर त्यांची साक्ष नोंदविलेली आहे. दोन्ही अर्जदारांवर कोणताही दबाव अथवा दडपण नाही याची खात्री या न्यायालयास झालेली आहे. त्यांच्यातील लग्नासंबंधी आता कोणताही वाद अस्तित्वात नाही. त्यांचे पती पत्नीचे नाते पुढे टिकणे अशक्य असल्याने त्या दोघांनीही घटस्फोट घेण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.

**०६.** अर्जदारांमधील विवाहासंबंधीचे सर्व वाद त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रातील अटी व शर्ती नुसार संपुष्टात आलेले आहेत. दोन्ही अर्जदार लग्नानंतर खारघर येथे वास्तव्यास होते व त्यामुळे सदर प्रकरण या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येते. दोन्ही अर्जदार हे १ वर्षापेक्षा जास्त काळापासून एकमेकांपासून विभक्त राहात आहेत. दोन्ही अर्जदारांना त्यांच्या निर्णयावर पुर्नविचार करण्यासाठी मध्यस्थी केंद्राकडे पाठविण्यात आले होते, परंतु दोन्ही अर्जदार हे संमतीने घटस्फोट घेण्याच्या निर्णयावर

ठाम आहेत. अर्जदार क्र. १ ला अर्जदार क्र.२ याने अंतिम पोटगी म्हणुन रक्कम रूपये ४०,००,०००/- दिलेले आहेत. हिंदु विवाह कायद्याचे कलम १३ ब ची सर्व पूर्तता झाली आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष होकारात्मक नोंदवित आहे व मुद्दा क्र.०२ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्र.०१ व अर्जदार क्र.०२ यांचा दि. ०६/१२/२०१९ रोजी झालेला विवाह विच्छेदित करण्यात येतो.

०३. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

०४. हुकूमनाम्याची प्रत हिंदु विवाह कायदा कलम २३(४) प्रमाणे दोन्ही अर्जदारांना मोफत देण्यात यावी.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.05.08 18:50:20 +0530

**दि. ०८/०५/२०२६** **(आर. वाय. खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर,**

**पनवेल.**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, या न्यायनिर्णयाच्या पि.डी.एफ फाईल मधील संपूर्ण मजकूर मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे. करिता प्रमाणपत्र दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| **निकाल तारिख** | : | **०८/०५/२०२६** |
| **पिठासीन अधिका–यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याची तारिख** | : | **०८/०५/२०२६** |
| **न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख** | : | **०८/०५/२०२६** |
| **लघुलेखकाचे नाव** | : | **श्रीमती. व्ही. आय. मद्रासी** |
| **न्यायालयाचे नाव** | : | **पाचवे सह दिवाणी न्यायालय,व.स्तर,पनवेल** |